# जिल्हा परिषद, गडचिरोली
# कंत्राटी शिक्षक भरती जाहिरात

जाहिरात क्रमांक:- 01 जाहिरात दिनांक:-13/08/2024

शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र दिनांक 15 जुलै, 2024 चे अनुषंगाने शासन पत्रानुसार पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सुचना मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक 19 जुलै, 2024 चे पत्रान्वये दिलेल्या आहेत. सदर शासन पत्रातील निर्देशाचे अनुषंगाने विविध टप्प्यानुसार केलेल्या कार्यवाही अंती प्राप्त आवेदन पत्राचे आधारे नियुक्तीची कार्यवाही करण्याचे अधीन राहून उर्वरित शिल्लक रिक्त पदाकरीता शासनपत्रातील टप्पां क्र. 3 नुसार अनुसूचित जमाती प्रवर्ग व अन्य कोणत्याही प्रवर्गातील शिक्षक पदासाठी पात्रता धारण करणारे उमेदवारांकडून पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदावर अगदी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून याद्वारे आवेदन पत्र मागविण्यात येत आहे. सदर नियुक्ती करीता आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अटी व शर्ती तसेच इतर आवश्यक दस्ताऐवजासंबधी तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. **किमान शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता :-**

अ) इ. 1 ते 5 करीता :- HSC, D.Ed./D.El.Ed/D.T.Ed./TCH, TET / CTET पेपर - 1 उत्तीर्ण, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी -2022 (TAIT) उत्तीर्ण.

आ) इ. 6 ते 8 करीता :- पदवी, D.Ed./D.El.Ed/D.T.Ed./TCH OR B.Ed./B.A.Ed./B.Sc.Ed., TET / CTET पेपर - 2 उत्तीर्ण, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी - 2022 (TAIT) उत्तीर्ण.

टिप:- शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) उत्तीर्ण उमेदवार पुरेशा प्रमाणात उपलब्ध न झाल्यास अट शिथील करण्याचा विचार करण्यात येईल.

2. **टप्पा क्र. 1 (सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी पदावर नियुक्ती) व टप्पा क्र. 2 (सन 2022 मधील अर्हता धारक उमेदवारांची कंत्राटी पदावर नियुक्ती) नंतर पेसा क्षेत्रातील शिल्लक रिक्त पदांची स्थिती :-**

अ) प्राथमिक शिक्षक (मराठी माध्यम) (इ. 1 ते 5 करीता) :- 419

आ) पदविधर प्राथमिक शिक्षक (इ. 6 ते 8 करीता) :- 120 (विषयनिहाय रिक्त पदांचा विचार करुन नियुक्ती केली जाईल.)

इ) वरिल नमूद रिक्त पदांची संख्या कमी / अधिक होऊ शकते.

3. **वयोमर्यादा :-** जाहिरातीमध्ये नमूद पदाकरीता जाहिरात प्रसिध्दीचे दिनांकास उमेदवाराचे किमान वय 18 वर्षापेक्षा कमी व 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीय / दिव्यांग उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्ष राहील).
4. **मानधन :-** शासन पत्र दि. 07/07/2023 अनुसार दरमहा रुपये 20,000/- एवढे मानधन अनुज्ञेय राहील.
5. **अर्ज कसा करावा :-** उमेदवाराने सोबत दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा आहे. अलीकडे काढलेला व स्वत:चा स्वाक्षरी केलेला फोटो लावावा. उमेदवारांनी अर्जासोबत आवश्यक त्या सर्व शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा व स्वसांक्षाकीत प्रती जोडाव्यात.

   1) SSC/HSC, गुणपत्रक व प्रमाणपत्र.
   2) पदवी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र.
   3) D.Ed./D.El.Ed/D.T.Ed./TCH/B.Ed. गुणपत्रक व प्रमाणपत्र.
   4) TET / CTET पेपर - 1 उत्तीर्ण (Qualified), शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी -2022 (TAIT) उत्तीर्ण प्रमाणपत्र.
   5) TET / CTET पेपर - 2 उत्तीर्ण (Qualified), शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी -2022 (TAIT) उत्तीर्ण प्रमाणपत्र.
   6) शाळा सोडल्याचा दाखला.
   7) स्थानिक अनुसुचित जमातीचा उमेदवार असल्यास पेसा क्षेत्रातील रहिवास प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

2022

6. **निवड व कार्यपध्दती** :- जाहिरातीव्दारे प्राप्त होणारे अर्जानुसार अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी (TAIT) मधील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल व या गुणवत्ता यादीतील रिक्त जागांच्या प्रमाणात उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.
7. **अर्ज स्विकारणे**:- नोंदणीकृत रजिस्टर पोस्टाने अर्ज पाठवितांना लखोट्यावर **कंत्राटी शिक्षक** या पदासाठी अर्ज असे ठळक अक्षरात लिहणे आवश्यक आहे. पोस्टाने पाठविलेले अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे नावे दिनांक 27/08/2024 रोजी सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी मिळतील अशा बेताने पाठवावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही. तसेच पोस्टाचे विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. याशिवाय उमेदवाराने स्वत: पुर्ण भरलेले अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली (दुसरा माळा) यांचे कार्यालयात दिनांक 27/08/2024 पर्यंत सकाळी 10.00 ते सायंकाळी 6.15 पर्यंत स्विकारण्यात येतील.
8. **<u>खालील प्रकारच्या उणीवा असलेला अर्ज नाकारण्यात येईल.</u>**
   1) वरिल अनुक्रमांक 1 मधील विहीत पात्रता धारण न करणा-या उमेदवाराचे अर्ज.
   2) मजकूर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज व स्वाक्षरी नसलेले अर्ज.
   3) आवश्यक शैक्षणिक व अर्हतेच्या स्वसाक्षांकित प्रती जोडले नसलेले अर्ज.
   4) विहीत मुदतीत प्राप्त न झालेले अर्ज.

   या पदाकरीता इतर सर्व अटी शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे राहतील व नियुक्ती संदर्भात सर्व अधिकार सक्षम प्राधिका-याकडे राखुन ठेवण्यात येत आहे.
9. **<u>अटी व शर्ती</u>** :-

1. सदर जाहिरातीनुसार पेसा क्षेत्रातील रिक्त पदावर नियुक्ती करावयाची असल्याने स्थानिक अनुसुचित जमातीच्या उमेदवारांना प्राधान्याने नियुक्ती देण्यात येईल.
2. वरिल नियुक्ती केवळ पेसा क्षेत्रातील शाळेतील रिक्त पदावर राहील.
3. नियुक्ती आदेश प्राप्त होताच तात्काळ नियुक्ती दिलेल्या शाळेवर हजर व्हावे लागेल.
4. मानधन रु. 20,000/- प्रतीमाह (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त) देय राहील.
5. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेशी विहित अटी व शर्ती मान्य असल्याबाबत करारनामा करणे आवश्यक राहील.
6. बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने शिक्षक पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील, या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र द्यावे लागेल. सदर बंधपत्र/हमीपत्रामध्ये करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा तसेच करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही.
7. नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेली पदस्थापना ही अंतिम राहील, याकरिता कोणत्याही प्रकारचे बाह्यस्थ दबाव आणता येणार नाही.
8. वरील सेवा देण्यास वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अथवा वैद्यकीय अधिक्षक, तालुका ग्रामीण रुग्णालय यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र रुजू होतांना संबधित गटशिक्षणाधिकारी यांचेकडे सादर करणे अनिवार्य राहील.
9. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती दरम्यान कोणतीही आकस्मिक घटना घडल्यास कोणत्याही प्रकारचे अनुकंपा लाभ, विमा लाभ अथवा इतर लाभ देय ठरणार नाही. सदर नियुक्ती ही अगदी तात्पुरत्या स्वरुपात असल्याने, शासन निकषानुसार विहित केलेले मानधन व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.
10. बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन घडल्यास अथवा गंभीर स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल.
11. सदर आदेशाद्वारे नियुक्त उमेदवारांना मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त प्रभार तसेच आर्थिक व प्रशासकीय अधिकार देय राहणार नाही. सदर उमेदवारांना केवळ अध्यापनाचे काम देण्यात येईल.

(आयुश्री सिंह, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

(बाबासाहेब पवार)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

# कंत्राटी शिक्षक पदासाठी अर्जाचा नमुना

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली

या ठिकाणी स्वता:चा पासपोर्ट आकाराचा फोटो लावावा व फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

**विषय**:- कंत्राटी शिक्षक पदासाठी करावयाचा अर्ज

2) संपूर्ण नाव:- अ) मराठीमध्ये (आडनाव प्रथम) :- ------------------------------------------------
ब) स्वत:चे नांव :- ------------------------------------------------
क) वडीलाचे नाव / पतीचे नाव :- ------------------------------------------------
ड) स्त्री / पुरूष : ------------------------------------------------

2) पत्रव्यवहाराचा पत्ता :- (भ्रमणध्वनी क्रमांकासह) :- ------------------------------------------------
:- ------------------------------------------------
:- ------------------------------------------------
:- ------------------------------------------------

3) अर्जदार कोणत्या जात प्रवर्गातील आहे. (योग्य ठिकाणी अशी √ खुण करावी)

| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

4) मागासवर्गीय असल्यास जात :- ------------------------------------------------

5) अनुसुचित जमाती मधील उमेदवार पेसा क्षेत्रातील रहीवासी आहे काय ? (होय/नाही) :------------------------------------------------

6) अर्जदाराची जन्मतारीख (अक्षरी) शालांत प्रमाणपत्राप्रमाणे :- ------------------------------------------------

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

7) जाहिरातीच्या तारखेस उमेदवाराचे वय :- ------------------------------------------------

8) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता:-

| अ. क्र. | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड / विद्यापीठ | एकुण गुण | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस. एस. सी. | | | | | |
| 2 | एच. एस. सी. | | | | | |
| 3 | डी. एड. | | | | | |
| 4 | TET/CTET Paper I | | | | | |
| 5 | TET/CTET Paper II | | | | | |
| 6 | TAIT | | | | | |
| 7 | पदवी -------------------- | | | | | |
| 8 | पदव्युत्तर पदवी ---------- ------------------------ | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 9 | बी.एड | | | | | |
| 10 | इतर अर्हता---------------<br>---------------------------<br>---------------------------<br>--------------------------- | | | | | |

9) राष्ट्रीयत्व :- ------------------------------

10) महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय? (होय / नाही) :- -----------------------------------------------

वर नमुद केलेला तपशिल माझे माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. ज्या पदासाठी विहीत केलेली अर्हता माझ्याकडे आहे, याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे मी आणखी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्या अनुषंगाने होणा-या इतर कार्यवाहीस मी पात्र राहील. याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**ठिकाण**:-
**दिनांक**:-

**अर्जदाराची स्वाक्षरी**

**पेसा क्षेत्रातील रिक्त पदावर कंत्राटी पध्दतीने अगदी तात्पुरत्या स्वरुपात प्राथमिक शिक्षक पदाकरीता विहित अर्हताधारक उमेदवारांना नियुक्ती संबधाने करावयाचा करारनामा (नमुना)**

**(रुपये 100 चे स्टँम्प पेपरवर)**

**लिहून घेणार :- शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली**

**लिहून देणार :- श्री./श्रीमती.------------------------------------------------------------**

**पत्रव्यवहाराचा पत्ता ----------------------------------------------------**

------------------------------------------------------------------------

मी वरिल करारनामा लिहून देणार विहित अर्हताधारक उमेदवार असून शासनाचे पत्र दिनांक 15 जुलै, 2024 मधील निर्देशानुसार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे दिनांक 24 जुलै, 2024 चे पत्रानुसार पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या रिक्त पदी कंत्राटी तत्वावर नियुक्ती करीता आवेदन पत्र सादर केले असून शासनाने ठरवून दिलेल्या खालील अटी व शर्ती मला मान्य असून याद्वारे कोणत्याही दबावाखाली न येता मी करारनामा लिहून घेणार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद गडचिरोली यांचे समक्ष करारनामा लिहून देत आहे.

**अटी व शर्ती:-**

1. वरिल नियुक्ती ही शासनाच्या पुढील सुचनेपर्यंतच राहील.
2. शासनाकडून पदभरतीबाबत नव्याने आदेश प्राप्त झाल्यास माझी नियुक्ती पुर्वसुचना न देताच संपुष्टात आणण्याचे सर्वस्वी अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.
3. सादर केलेले शैक्षणिक व व्यावसायिक दस्ताऐवज खोटे असल्याचे प्राप्त तक्रारीनुसार चौकशी अंती आढळून आल्यास दिलेली नियुक्ती रद्द होण्यास व उचित फौजदारी कार्यवाहीस पात्र राहीन.
4. हे आदेश प्राप्त होताच तात्काळ नियुक्ती दिलेल्या शाळेवर हजर राहीन.
5. मानधन रु. 20,000/- प्रतीमहा (कोणत्याही इतर लाभाव्यतिरिक्त) देय राहील.
6. करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीत शिक्षकीय पदाचे विहित काम पूर्ण करण्याची जबाबदारी माझी राहील.
7. शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मला मान्य राहतील तसेच नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी मी करणार नाही.
8. नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेली पदस्थापना ही मला मान्य राहील, याकरिता कोणत्याही प्रकारचे बाह्यस्थ दबाव आणणार नाही.
9. वरील सेवा देण्यास वैद्यकीयदृष्ट्या सक्षम असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक अथवा वैद्यकीय अधिक्षक, तालुका ग्रामीण रुग्णालय यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र रुजू होतांना संबधित गटशिक्षणाधिकारी यांचेकडे मी सादर करेन.
10. सदर कंत्राटी तत्वावरील नियुक्ती दरम्यान कोणतीही आकस्मिक घटना घडल्यास कोणत्याही प्रकारचे अनुकंपा, विमा अथवा इतर शासकीय लाभ देय ठरणार नाही. सदर नियुक्ती ही अगदी तात्पुरत्या स्वरुपात असल्याने, शासन निकषानुसार कोणतेही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.
11. बंधपत्र/हमीपत्र नियुक्तीच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन घडल्यास अथवा गंभीर स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.
12. मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त प्रभार तसेच आर्थिक व प्रशासकीय अधिकार यासंबधाने मला दावा करता येणार नाही.

मी करारनामा लिहून देणार श्री./श्रीमती --------------------------------------------------------------, मला वरिल सर्व अटी व शर्ती मान्य असून ते बंधनकारक राहील.

दिनांक :-

लिहून देणाऱ्याचे नाव व स्वाक्षरी

---------------------------------------------

---------------------------------------------

साक्षीदार (नाव व स्वाक्षरी) :-

1. ------------------------------------------
2. ------------------------------------------